## Mahavir Sugarcane Nursery



# विद्यार्थ्यांनी प्रगत शेतीकडे वळावे : मोहन गरगटे

कोल्हापूर, ता. ११ : 'विद्यार्थ्यांनी नोकरींच्या पाठीमागे न धावता नवतंत्रज्ञानयुक्त शेती करावी. पुढचा काळ हा सघन शेतीचा आहे,' असे मत श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मोहन गरगटे यांनी व्यक्त केले. महावीर महाविद्यालयाच्या बी व्होक ॲग्रीकल्चर विभागाच्या ऊस रोपवाटिका लागणीचा प्रारंभ गरगटे व संचालक नरेंद्र देसाई यांच्या हस्ते झाला. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे प्रमुख उपस्थित होते.

गरगटे म्हणाले, 'विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे शेतीमध्ये थेट प्रशिक्षण मिळत असल्याने एक नवा आत्मविश्वास त्यांच्यात वाढीस लागेल व पारंपरिक शेती करण्याचा दृष्टिकोन बदलेल,' देसाई म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी शेतीतील एक नवा आदर्श निर्माण करावा.' ऊस तोडणी यंत्राला पुष्पहार घालून रोपवाटिकेच्या कामाला प्रारंभ केला. पर्यवेक्षक राजेंद्र हिरकुडे, डॉ. रवींद्र मिरजकर उपस्थित होते. बी. व्होक. विभागप्रमुख डॉ. संदीप नलवडे यांनी स्वागत केले



कोल्हापूर : बी व्होक ॲग्रीकल्चर विभागाच्या ऊस रोपवाटिका लावण प्रारंभप्रसंगी बोलताना मोहन गरगटे. शेजारी प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे व अन्य.



॥ शीलं परं भूषणम् ॥
श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
(स्वायत्त)
NAAC 'A' Grade
बी. व्होक. ॲग्रीकल्चर विभाग
महावीर ऊस रोपवाटिका
आमचेकडे Co. 86032 व Co.265 जातीची
उत्तम प्रतीची ऊसाची रोपे मिळतील.
संपर्क . : डॉ. संदीप नलवडे मोबा.: ७७४४००४२४२, शरद बंगडे मोबा.: ८४११०४०१०४,
कु. ओंकार चव्हाण मोबा.: ७०६६८३३६५८, कु. रोहन मळवडे मोबा.: ७०५८८५८१७१

# Vermicompost Project




GPS Map Camera
Beed, Maharashtra, India
J4WC+6Q3, Beedshed Main Road, near Kalleshwar temple, Kasaba, Beed, Maharashtra 416011, India
Lat 16.646152°
Long 74.123894°
13/02/23 09:41 AM GMT +05:30
Google

# Wild Vegetable Exhibition

'चवीने खाणार त्याला निसर्ग देणार'

**महिला बचतगटांचे रानभाज्या व पौष्टिक तृणधान्याचे खाद्य पदार्थ स्टॉल**

- ✻ पारंपारिक पदार्थांचा आस्वाद घेण्याची दुर्मिळ संधी
- ✻ चला तर आगळ्या वेगळ्या रानभाज्या रानचारा संवर्धन अभियान सहभागी होऊ या !
- ✻ पौष्टिक तृणधान्याची शिंगटी व सजोरी इतर पदार्थ
- ✻ राजगिराचे विविध पदार्थ
- ✻ शेवग्याचे विविध पदार्थ
- ✻ विविध रानभाज्याचे भजी, सुप, लोणचे व इतर पदार्थ
- ✻ पौष्टिक तृणधान्याच्या भाकरी व थालीपीठे



बुक-पोस्ट

प्रति,
मा. ____________

✻ प्रेषक ✻

**प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे**
महावीर महाविद्यालय,कोल्हापूर (स्वायत्त)
फोन. (०२३१) २६५१८३०

✻ संयोजक ✻

**डॉ. संदीप अर्जुन नलवडे**
(समन्वयक, बी.व्होक विभाग)
मोबा. ७७४४००४२४२

बी.व्होक ॲग्रीकल्चर विभाग

प्रा. नम्रता शिंगे — मोबा : ७०८३३८७१७५
प्रा. श्रृती गिजवणेकर — मोबा.: ७७२०००५९०४
प्रा. प्रतिराज मोरे — मोबा.: ७२७६१२४१५०

।। शीलं परं भूषणम् ।।
श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित

## महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

नॅक 'अ' मानांकन
बी.व्होक ॲग्रीकल्चर विभाग आयोजित
**Dept. B.Voc. Agriculture**

**आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त २०२३**

**रानभाज्या व रानचारा संवर्धन अभियान**
शनिवार दि. २ सप्टें. ते सोमवार दि. ४ सप्टें.२०२३

## सस्नेह निमंत्रण ...

**मानव व दुधाळ जनावरांच्या आरोग्यासाठी एक पाऊल पुढे**

✻ स्थळ ✻
श्री आचार्य विद्यानंद संस्कृती भवन,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

✻ प्रदर्शन कालावधी ✻
शनिवार दि. २ सप्टेंबर, २०२३ ते
सोमवार दि. ४ सप्टेंबर, २०२३
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ पर्यंत

मा. महोदय,
सस्नेह नमस्कार

महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त) व दलितमित्र बापूसाहेब पाटील ग्रंथालय संचलित, निसर्गमित्र परिवार कोल्हापूर. ओंकार वेलफेयर फौंडेशन ,कोल्हापूर. पंचमुखी गणेश महिला बचत गट, कोल्हापूर. गो ॲग्रीटेक वैरण उत्पादक संस्था, कोल्हापूर व आदर्श सहेली मंच कोल्हापूर यांच्या वतीने रानभाज्या व रानचारा संवर्धन अभियान व अभ्यासपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन केले

✻ आपले नम्र ✻

**डॉ. राजेंद्र लोखंडे**, प्राचार्य, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.
**अनिल चौगुले**, कार्यवाह, निसर्गमित्र परिवार, कोल्हापूर.

**✻ शनिवार दि. २ सप्टेंबर, २०२३ ✻**

वेळ दु. २.०० वा.

**रानभाज्या,रानचारा प्रदर्शन**

✻ उद्घाटक ✻
**मा.श्री. अरुण डोंगळेसो**
चेअरमन, गोकुळ दुध संघ, कोल्हापूर

✻ कार्यक्रमाचे अध्यक्ष ✻
**ॲड. के. ए. कापसेसो**
चेअरमन, श्री आ.दे.शि.प्र.मंडळ, कोल्हापूर

✻ प्रमुख उपस्थिती ✻
**श्री. एम. बी. गरगटे**, सेक्रेटरी, श्री आ.दे.शि.प्र.मंडळ, कोल्हापूर
**श्री. जी. बी. रोटे**, खजिनदार, श्री आ.दे.शि.प्र.मंडळ, कोल्हापूर

सर्व सन्माननिय संचालक श्री आ.दे.शि.प्र.मंडळ, कोल्हापूर

रानचारा ओळख व भविष्यातील जनावरांच्या चारा विषयक कृती कार्यक्रम

✻ शेतकरी मेळावा ✻
वेळ दु. ३.०० ते.५.०० वा.

- ✻ दुधाळ जनावरांसाठी सकस व पौष्टिक वैरण निर्मितीसाठी जागर.
- ✻ कमी कालावधी दर्जेदार वैरण निर्मिती व नवीन रोजगाराच्या संधी
- ✻ पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व व आरोग्यदायी उपयोग
- ✻ दुधाळ जनावरांना आयुर्वेदिक उपचार पध्दती

✻ प्रमुख मार्गदर्शक ✻
**डॉ. विजय मगरे**, पशुवैद्यकीय अधिकारी, गोकुळ दुधसंघ, कोल्हापूर.
**डॉ. योगेश बन**, विभागीय कृषि संशोधन केंद्र, कोल्हापूर.
**श्री. योगेश खराडे**, अध्यक्ष, गो ॲग्रीटेक वैरण उत्पादक संस्था, शिंदेवाडी
**श्री. सागर किल्लेदार**, शेतकरी प्रशिक्षक (तिटवे)

**✻ रविवार दि. ३ सप्टेंबर, २०२३ ✻**

वेळ दु. १२.०० वा.
(स्वातंत्र्य सैनिक बाबुराव गोकरुवा राजेमहाडीक यांच्या स्मरणार्थ)

**भरड धान्य व रानभाज्या पाककृती स्पर्धा**

: पाककला स्पर्धा उद्घाटक :
**डॉ. सौ. सुषमा जी. रोटे**
संचालिका, श्री आ.दे.शि.प्र.मंडळ, कोल्हापूर

: संयोजक व सहकार्य :
**श्री. बाबासो राजेमहाडीक**

मोह फूल, रानभाजी वृक्षाचे महत्व व फूलांची पाककृती प्रात्यक्षिक

✻ आमटीला दगडाच्या फोडणीची प्रात्यक्षिके ✻
सादरकर्त्या : सौ. राणिता अनिल चौगुले, कु. कस्तुरी मोहन जाधव

**स्पर्धेचे नियम व अटी :**

- ✻ स्पर्धा ग्रामीण व शहरी दोन विभागत होईल.
- ✻ पौष्टिक तृनधान्य व रानभाज्या अशा दोन वेगवेगळ्या स्पर्धा होतील.
- ✻ स्पर्धकांनी दोन्ही पाककृती स्पर्धेत सहभाग नोंदवता येईल.
- ✻ स्पर्धेला प्रवेश फी नाही. पण नांव नोंदणी करणे आवश्यक असेल.
- ✻ परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
- ✻ स्पर्धकांना परिक्षकांच्या व संयोजकांच्या सुचनाचे पालन करणे बंधनकारक असेल.
- ✻ दोन विभागातील प्रथम ३ क्रमांकाच्या विजेत्यांना पर्यावरणपूरक भेट व उत्तेजनार्थासाठी पुस्तके बक्षीसे म्हणून देण्यात येतील.
- ✻ स्पर्धेसाठी नाव नोंदणी अंतिम दिनांक ३१ ऑगस्ट २०२३
- ✻ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांने पाककृती घरी बनवून आणणे व पाककृतीचे सादरीकरण करणे गरजेचे आहे.

: नांव नोंदणीसाठी संपर्क :
प्रा. नम्रता शिंगे — मोबा : ७०८३३८७१७५
प्रा. श्रृती गिजवणेकर — मोबा.: ७७२०००५९०४

**✻ सोमवार दि. ४ सप्टेंबर, २०२३ ✻**

वेळ दु. १२.०० वा.

- ✻ वृक्ष, वेली झुडूपवर्गीय संवर्धन व वापर करण्याच्या निसर्ग प्रेमींचे अनुभव कथन
- ✻ रानभाज्या संवर्धन करणाऱ्यांचे अनुभव कथन
- ✻ रंग देणाऱ्या वनस्पतींचे ओळख, शेती व प्रात्यक्षिके

✻ सादरकर्ते ✻
श्री. मोहन माने, श्री.पराग केमकर, श्री. अमोल सरनाईक, श्री. अजय पाटील, प्रा. टी. के. सरगर, श्री. यश चौगुले

वेळ दु. ५.०० वा.
**बक्षीस वितरण व गौरव समारंभ**

✻ प्रमुख पाहुणे ✻
**मा. सुरेश शिपूरकर**, संस्थापक अध्यक्ष,
**सौ. अनुराधा मेहता**, अध्यक्ष,
दलित मित्र बापूसाहेब पाटील ग्रंथालय, शाहूपूरी कोल्हापूर.

✻ कार्यक्रमाचे अध्यक्ष ✻
**डॉ. राजेंद्र लोखंडे**
प्राचार्य, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.


॥ शील परं भूषणम् ॥
श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)
व निसर्गमित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने
बी. व्होक. ॲग्रीकल्चर विभाग आयोजित
आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष २०२३ निमित्त



# Inauguration of cooking competition










नाचणीचे
काळा गुलाबजामुन






सेवनाने कमी होते.
वजन कमी करण्यासाठि
सेवन केले जाते.






॥ शील परं भूषणम्॥
श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)
व निसर्गमित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने
बी. व्होक. ॲग्रीकल्चर विभाग आयोजित
आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष २०२३ निमित्त
रानभाज्या व रानचारा संवर्धन अभियान
उद्घाटन सोहळा
उद्घाटक
प्रमुख उपस्थिती


आचार्य विद्यानंद संस्कृति भवन
महावीर महाविद्यालय,
कोल्हापूर (स्वायत्त)
बी.व्होक
अॅग्रीकल्चर
विभाग आयोजित
रानभाज्या
व
रानचारा
संवर्धन अभियान
सहर्ष
स्वागत
सहर्ष
स्वागत
७०
पेक्षा

[redacted]

पुढारी

# दुर्मीळ रानभाज्यांच्या अनोख्या मेजवानीचा खवय्यांनी घेतला आस्वाद

## रानभाज्या, भरडधान्य पदार्थांच्या पाककृती स्पर्धेला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केना वनस्पतीपासून बनवलेले पराठे, दुर्मीळ नरवेलीपासून बनवलेली भाकरी, नाचणीचे पौष्टिक गुलाबजामून, आघाड्यापासून बनविण्यात आलेली भजी, भरडधान्याचा खमंग ढोकळा, कांगुण्याची भाजी असे अनेक पदार्थ उपस्थितांनी पहिल्यांदा ऐकले. अशा अनोख्या पदार्थांची मेजवानी महावीर महाविद्यालयात आयोजित रानभाजी व भरडधान्य पाककृती स्पर्धेच्या निमित्ताने खवय्यांना अनुभवता आली.

महावीर महाविद्यालय बी. व्होक. ॲग्रीकल्चर विभाग, निसर्गमित्र परिवार, गो ॲग्रीटेक वैरण उत्पादक संस्था, ओंकार वेल्फेअर फाऊंडेशन, आदर्श सहेली मंच, पंचमुखी गणेश महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रानभाज्या व रानचारा संवर्धन अभियानाअंतर्गत रविवारी पाककृती स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विजेत्यांना संस्थेच्या डॉ. सुषमा रोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, डॉ. संदीप नलवडे, बाबा राजेमहाडिक यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कै. बाबुराव राजेमहाडिक यांच्या नावानेही बक्षिसे देण्यात आली.

यावेळी डॉ. सुषमा रोटे, निसर्गमित्रचे अनिल चौगुले यांनी रानभाज्यांचे महत्त्व सांगितले.

**स्पर्धेचा निकाल असा :**

शहरी विभाग : प्रथम क्रमांक : वैष्णवी जाधव (अंबाडा भाजी, भाकरी), द्वितीय क्रमांक : धनश्री भगत (केना पराठे, कमल काकडी सांडगे), तृतीय क्रमांक : रामेश्वरी आरडे (बाजरी उंडे). ग्रामीण विभाग : प्रथम : क्रांती महिला बचत गट, आवळी खुर्द (सर्वसमावेशक थाळी), द्वितीय : सानिका पाटील (चवळीची भाजी, भाकरी), तृतीय : पूनम वडर (डांगर, उडीद भरड).

परीक्षक म्हणून प्रा. शशिकला सरगर, संध्या जाधव यांनी काम पाहिले. यावेळी राणिता चौगुले, अस्मिता चौगुले, अभिजित केंबळे, पराग केमकर उपस्थित होते.



**कोल्हापूर : महावीर महाविद्यालय येथे आयोजित रानभाजी व भरडधान्य पाककृती स्पर्धेतील विजेत्यांसोबत डॉ. सुषमा रोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, डॉ. संदीप नलवडे, बाबा राजेमहाडिक, अनिल चौगुले, राणिता चौगुले आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

# महावीर महाविद्यालयात शनिवारपासून रानभाज्या महोत्सव

कोल्हापूर, ता. २९ : महावीर महाविद्यालयातील बी. व्होक ॲग्रीकल्चर विभाग, निसर्गमित्र परिवार, ओंकार वेल्फेअर फाऊंडेशन, पंचमुखी गणेश महिला बचत गट, गो ॲग्रीटेक वैरण उत्पादक संस्था, आदर्श सहेली मंचतर्फे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त शनिवार (ता. २) ते सोमवारपर्यंत (ता. ४) रानभाज्या व रानचारा संवर्धन अभियानांतर्गत प्रदर्शनाचे आयोजन केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, ''हे प्रदर्शन श्री आचार्य विद्यानंद संस्कृती भवन येथे सकाळी दहा ते सायंकाळी सात वेळेत होईल. शनिवारी दुपारी दोन वाजता प्रदर्शनाचे उद्‌घाटन 'गोकुळ'चे अध्यक्ष अरुण डोंगळे यांच्या हस्ते होईल. आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे अध्यक्षस्थानी असतील. सचिव एम. बी. गरगटे, खजिनदार जी. बी. रोटे उपस्थित राहतील. शेतकरी मेळावा दुपारी तीन ते सायंकाळी पाच वेळेत होईल. 'गोकुळ'चे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय मगरे, विभागीय कृषी संशोधन केंद्राचे डॉ. योगेश बन, योगेश खराडे, सागर किल्लेदार मार्गदर्शन करतील.''

निसर्गमित्र संस्थेचे कार्यवाह अनिल चौगुले म्हणाले, ''रविवारी दुपारी १२ वाजता स्वातंत्र्य सैनिक बाबुराव राजेमहाडिक यांच्या स्मरणार्थ पौष्टिक तृणधान्य व रानभाज्या पाककृती स्पर्धेचे उद्‌घाटन मंडळाच्या संचालिका डॉ. सुषमा रोटे यांच्या हस्ते होईल. बाबा महाडिक यांचे संयोजन असेल.''